# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३१४ मंगळवार दि.१७ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज्यात पावसाचा हाहाकार, वीज पडून ९ जणांचा मृत्यू, ७ जखमी, जनजीवन विस्कळीत


मुंबई : महाराष्ट्रात मान्सूनने जोरदार हजेरी लावली असून, मुसळधार पावसासह विजेच्या कडकडाटाने राज्यभर हाहाकार माजला आहे. शनिवारी (१४ जून २०२५) वीज पडून ९ जणांचा मृत्यू झाला, तर ७ जण गंभीररीत्या भाजले गेले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दोन सख्ख्या भावांसह चार जणांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे ढगफुटीसदृश पावसाने पूरस्थिती निर्माण झाली, तर अहिल्यानगर येथील सीना धरण ४० वर्षांत प्रथमच जूनमध्येच पूर्ण भरले आहे. हवामान खात्याने रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसाठी रेड अलर्ट जारी केला असून, मुंबईसाठी यलो अलर्ट कायम आहे. वीज पडून ९ जणांचा मृत्यू शनिवारी राज्यभरात मुसळधार पाऊस आणि विजांचा कडकडाट सुरू होता. या नैसर्गिक आपत्तीमुळे ९ जणांचा मृत्यू झाला, तर ७ जण गंभीररीत्या भाजले गेले. यश राजू काकडे (१४, रा. सारोळा) आणि रोहित राजू काकडे (२१, रा. सारोळा) हे दोन सख्खे भाऊ शेतात काम करत असताना वीज पडून मृत्यूमुखी पडले. रंजना बापूराव शिंदे (५०, रा. मोंढा बु.) घराजवळ वीज पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर शिवराज सतीश गव्हाणे (३१, रा. पिंपळदरी) यांच्यावर शेतात काम करताना वीज पडली. याशिवाय, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७ जण गंभीररीत्या भाजले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. परभणी येथील पिंप्राळा येथे माणिक महादराव मिरासे (४७) यांचा वीज पडून मृत्यू झाला. तर धुळे येथील ताजापुरी येथे नथ्थू हरचंद सनेर (६३) यांचा मृत्यू झाला जळगाव येथील मोहित जगतसिंग पाटील (२५, रा. खेडगाव नंदीचे, ता. पाचोरा), शांताराम शंकर कठोरे (४४, रा. पूर्णाड, ता. मुक्ताईनगर) तर अमरावती तुरखेड येथील पवन कोल्हे (२५) यांचा मृत्यू झाला. या घटनांमुळे मृतांच्या कुटुंबियांवर शोककळा पसरली असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. रत्नागिरीत ढगफुटीसदृश पाऊस रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात शुक्रवारी रात्री (१३ जून २०२५) ढगफुटीसदृश मुसळधार पावसाने हाहाकार माजवला. यामुळे नद्यांना पूर आला, आणि तालुक्यातील अनेक गावांना फटका बसला. प्रसिद्ध आडिवरे येथील श्रीदेवी महाकाली मंदिराच्या आवारात तब्बल ३७ वर्षांनंतर प्रथमच पुराचे पाणी शिरले, ज्यामुळे स्थानिकांमध्ये चिंता पसरली. पूरस्थितीमुळे रस्ते, शेती आणि घरांचे नुकसान झाले आहे. स्थानिक प्रशासनाने पूरग्रस्तांना मदत आणि बचावकार्य सुरू केले आहे. सीना धरण ४० वर्षांत प्रथमच जूनमध्येच पूर्ण भरले अहिल्यानगर जिल्ह्यातील सीना धरण यंदा मे महिन्यापासूनच झालेल्या सततच्या पावसामुळे जूनमध्येच पूर्ण भरले आहे, जे गेल्या ४० वर्षांतील पहिलीच घटना आहे. २.४० टीएमसी क्षमता असलेल्या या धरणातून १६ जून रोजी दुपारी १२ वाजता २२० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला. सीना नदीच्या उगमस्थानापासून प्रवाह परिसरात मेपासून पावसाचा जोर असल्याने ही अभूतपूर्व घटना घडली. शेतकऱ्यांना



मोठा दिलासा कर्जत तालुक्यातील २१ गावांना लाभदायी ठरणारे हे धरण भरल्याने शेतकरी सुखावले आहेत. तहसीलदार गुरू बिराजदार यांनी धरण पूर्ण भरल्याची अधिकृत पुष्टी केली, तर सहायक अभियंता संभाजी पवार यांनी सांडव्यातून पाणी वाहण्याची माहिती दिली. हवामान खात्याचा इशारा हवामान खात्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. सोमवारी (१६ जून) सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर कोकणातील इतर जिल्हे (रायगड, ठाणे, पालघर) आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि उपनगरांसाठी यलो अलर्ट देण्यात आला असून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तसेच ठाणे, कल्याण, भिवंडी या परिसरात शनिवारी सायंकाळी जोरदार पाऊस झाला, ज्यामुळे रस्त्यांवर पाणी साचले. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने वीज पडून मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना तातडीने मदत जाहीर केली असून, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी स्थानिक प्रशासनाने बचाव पथके आणि आपत्कालीन यंत्रणा तैनात केल्या आहेत. पूरग्रस्तांना तात्पुरते निवारे आणि अन्नपुरवठा केला जात आहे. नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन महाराष्ट्रात मान्सूनच्या जोरदार आगमनाने वीज पडून ९ जणांचा मृत्यू, ७ जण जखमी, आणि रत्नागिरीत ढगफुटीसदृश पावसाने हाहाकार माजवला आहे. सीना धरण ४० वर्षांत प्रथमच जूनमध्येच भरल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. परंतु पावसाचा जोर आणि पूरस्थितीमुळे अनेक भागांत तणावपूर्ण परिस्थिती आहे. हवामान खात्याने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केले असून, नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने तातडीच्या उपाययोजना सुरू केल्या असल्या, तरी पावसाळ्यातील सुरक्षिततेचे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

## अजित पवार मावळ दुर्घटनेची जबाबदारी घेणार का? संजय राऊतांचा संतप्त सवाल

मावळ, पुणे : पुण्याच्या मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल रविवारी (१५ जून) दुपारी साडेतीनच्या सुमारास कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, ३२ जण जखमी झाले, तर २-३ जण अजूनही बेपत्ता असण्याची शक्यता आहे. रविवारच्या सुट्टीमुळे पर्यटकांची मोठी गर्दी आणि पुलाचा अतिभार यामुळे हा जीर्ण पूल कोसळल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेने राजकीय वातावरण तापले असून, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सरकार आणि पालकमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. आमदार-खासदार विकत घेण्यासाठी पैसे आहेत, पण पूल दुरुस्तीसाठी नाही? असा संतप्त सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे. संजय राऊतांचा सरकारवर हल्लाबोल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या दुर्घटनेवरून महायुती सरकार आणि पालकमंत्री अजित पवार यांच्यावर सडेतोड टीका केली. संजय राऊत म्हणाले, मावळमधील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला, आणि चार जणांचा मृत्यू झाला. याचा खरा आकडा समोर येत नाही. कित्येक लोक वाहून गेले. अजित पवार हे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांना याबद्दल गर्व आणि अहंकार आहे, पण या दुर्घटनेची जबाबदारी घेणार का? असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना सांगितले, या पुलासाठी कागदावर ७-८



कोटी रुपये मंजूर झाल्याचे सांगितले जाते, पण पूल का बांधला गेला नाही? मंजूर पैसे कुठे गेले? आमदार-खासदार विकत घेण्यासाठी, मते विकत घेण्यासाठी पैसे मिळतात, पण जनतेच्या जीवाशी खेळणारा पूल दुरुस्त करण्यासाठी पैसे नाहीत? असंही संजय राऊत म्हणाले. ११ जुलै २०२४ रोजी माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुलाच्या दुरुस्तीसाठी मंजुरी दिल्याचे पत्र रवींद्र भेगडे यांना पाठवले होते. ८ कोटींच्या कामासाठी ८० हजारांचे पत्र मंजूर करणारे मंत्री झोपलेले असतात. हेच सरकारचे जनतेच्या प्रति प्रेम आहे. मोठ्या बिल्डरांची आणि ठेकेदारांची कामे करताना सरकार जागे असते, पण अशा छोट्या कामात झोपलेले असते, असं म्हणत राऊत यांनी सरकारवर निष्काळजीपणाचा आणि प्राधान्यक्रम चुकवण्याचा आरोप केला आहे. सरकारचे इतके विभाग आहेत, ते नक्की काय करतात? राज ठाकरेंचा सवाल सरकारचे इतके विभाग आहेत, ते नक्की काय करतात? त्यांनी दर काही महिन्यांनी किंवा या घटनेपुरतं बोलायचं झालं तर पावसाळ्याच्या आधी धोकादायक पूल कुठले आहेत, त्याची तपासणी, त्याची एकतर दुरुस्ती किंवा ते बंद करणे असं काही नियोजन करता येत नाही? बरं प्रशासन करत नसेल तर इतकी वर्ष सत्तेत असलेल्यांना याचं नियोजन करून प्रशासनाकडून कामं करून का घेता येत नाहीत? आणि जर येत नसतील तर मग तुमच्या सत्तेचा अनुभव नक्की कुठला आणि त्याचा तुम्हाला असेल उपयोग पण राज्याला काय उपयोग? असे म्हणत राज ठाकरे यांनी सरकारला सुनावले आहे. मी तिघांचा मृत्यू डोळ्यांनी पाहिला दरम्यान, योगेश यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मी मृत्यूला डोळ्यांदेखत पाहिलं. पूल कोसळला तेव्हा मी आणि शिल्पा मध्यभागी होतो. ज्या तिघांचा मृत्यू झाला, त्यांचा मृत्यू मी जवळून पाहिला. लोक ओरडत होते, 'घाई करू नका, जाऊ नका,' पण कोणी ऐकलं नाही. अचानक पूल खचला आणि सगळे नदीच्या पाण्यात पडलो. मी आणि शिल्पा कसेबसे किनाऱ्यापर्यंत पोहचलो, पण अनेकजण प्रवाहात वाहून गेले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळणी येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

औसा: औसा तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशोत्सव आयोजित करण्यात आला होता यावेळी इयत्ता पहिलीच्या पालकांचा आणि बालकांचा इयत्ता पहिलीचे वर्गशिक्षक अनिल कांबळे यांनी शाळेत आल्याबरोबर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर सर्वांना एकत्रित करून लहान मुलांना फुगे वाटण्यात आली तसेच त्यांना खाऊ देण्यात आला. यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच सत्यवान जाधव यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष नंदकिशोर जाधव माजी ग्रा प सदस्य संदीप भुजबळ शाळेचे मुख्याध्यापक सत्यप्रकाश भोसले हरीश बोने रवि कुरील अनिल कांबळे श्रीमती सुवर्णा कोळसुरे रंजना हादवे सोनाली गिरी मॅडम सह विद्यार्थी व पालक उपस्थित होते यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळेत गोड भात बनवण्यात आला होता. अत्यंत उत्साही वातावरणामध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



## राजकोट किल्ल्यावरील नव्याने उभारलेल्या शिवरायांच्या पुतळ्याजवळील जमीन खचली; रोहित पवारांनी साधला सरकारवर निशाणा

मालवणमधील ऐतिहासिक राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याजवळील बाजूची काही माती खचली असल्याचे वृत्त समोर आले आहे. गेल्या महिन्यातच राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नव्याने उभारण्यात आला होता. या पुतळ्याला अभिवादन करून विधीवत पूजन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते. रविवारी दुपारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याच्या बाजूचा काही भाग खचल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने याची तातडीने दुरुस्ती हाती घेतली. रात्री उशिरापर्यंत खचलेल्या भागात भराव टाकून सिमेंटने सर्व भाग बुजवण्यात आला आहे. मात्र आता पुन्हा एकदा कामाच्या दर्जाबद्दल अनेक सवाल उपस्थित राहिले आहे. यावर आता ट्वीट करत रोहित पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. रोहित पवार यांचे ट्वीट



निकृष्ट दर्जाच्या साहित्यामुळं मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला होता आणि आता नव्याने उभारलेल्या पुतळ्याला शंभर वर्षे काहीही होणार नाही असा दावा सरकारने केला असताना पुतळ्याच्या अनावरणाला शंभर दिवसही झाले नसताना पुतळ्याच्या चबुतऱ्याचा भराव खचला. यावरुन हे सरकार महापुरुषांचे पुतळे विचारांचा आदर्श आणि प्रेरणा म्हणून उभारतंय की केवळ ठेकेदारांसाठी, असा प्रश्न पडतो. विचारांनाच खोली नसेल तर अशा सरकारकडून पुतळ्याच्या भक्कम पायाची अपेक्षा कशी करणार?, असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. आता यावर तात्पुरती डागडुजी केली जाईल पण महिन्याभरात भराव कसा खचला याचं उत्तर सरकारने द्यावं. भराव खचल्याचा अर्थ हे कामसुद्धा निकृष्ट दर्जाचं आहे, हे दिसतं आणि शिवप्रेमी म्हणून आम्ही हे कदापी खपवून घेणार नाही, सरकारने याची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी रोहित पवार यांनी केली आहे. पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाले होते शिवरायांच्या पुतळ्याचे उद्घाटन दरम्यान, राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२३ मध्ये केले होते. त्यानंतर अवघ्या काही महिन्यातच हा पुतळा पडण्याची धक्कादायक घटना घडली होती. यानंतर राज्यात याचे पडसाद उमटले होते. त्यानंतर नवीन पुतळा उभारला, मात्र अवघ्या काही काळातच चबुतऱ्यालगतची जमीन खचल्याने बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी ! धान उत्पादकांना १८० कोटींचा बोनस, १८ जूनपासून खात्यात 'खटाखट' पैसे जमा होणार !

गोंदिया : गोंदियातील धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारी बातमी आहे. गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या धान बोनस योजनेची अंमलबजावणी आता सुरू झाली असून, शासनाने जिल्ह्यासाठी १८० कोटी ६३ लाख ५६ हजार रुपये निधी मंजूर केला आहे. १८ जून २०२५ पासून हा बोनस शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होण्यास सुरुवात होणार आहे. १ लाख ५६ हजार ४३२ शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरले असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, बोनस मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल काही शेतकऱ्यांमध्ये नाराजीही कायम आहे.



नेमकी काय आहे बोनस योजना? नागपूर हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी बोनस योजनेची घोषणा केली होती. या योजनेअंतर्गत, दोन हेक्टर शेतीसाठी २०,००० रुपये बोनस देण्याचे जाहीर करण्यात आले होते. ही योजना शासकीय धान खरेदी केंद्रांवर धान विक्री करणाऱ्या नोंदणीकृत शेतकऱ्यांसाठी लागू आहे. गोंदिया जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आणि जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांनी शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी केली असून, यादीची पडताळणी पूर्ण झाली आहे. नोंदणीकृत शेतकरी: एकूण १ लाख ५६ हजार ४३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे, त्यापैकी ७६,२३४ शेतकऱ्यांनी फेडरेशनला धान विक्री केली. धान खरेदी: २५ लाख क्विंटल धान शासकीय केंद्रांवर खरेदी करण्यात आले. बोनस रक्कम: १८० कोटी ६३ लाख ५६ हजार रुपये बोनस म्हणून वितरित होणार आहे. वितरणाची तारीख: १८ जून २०२५ पासून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट निधी जमा होण्यास सुरुवात होईल. शेतकऱ्यांना दिलासा, पण विलंबाची नाराजी या योजनेची घोषणा डिसेंबर २०२४ मध्ये झाली असली, तरी त्याची अंमलबजावणी होण्यास तीन महिन्यांहून अधिक कालावधी लागला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये काही काळ असंतोषाचे वातावरण होते. एका शेतकऱ्याने सांगितले, हा बोनस याआधीच मिळायला हवा होता. आम्ही धान विक्री केल्यानंतर सहा महिने वाट पाहिली. आता पैसे खात्यात येणार म्हणून समाधान आहे, पण विलंब का झाला याचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

दरम्यान, जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, नोंदणी आणि यादी पडताळणी प्रक्रियेमुळे काही विलंब झाला, पण आता सर्व तयारी पूर्ण झाली आहे. १८ जूनपासून बोनस वितरणाला सुरुवात होईल. आदिवासी आणि जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांनी शेतकऱ्यांच्या नोंदणी आणि धान खरेदीची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. यादी पडताळणीनंतर, बोनस वितरणासाठी १८० कोटी ६३ लाख ५६ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे. हा निधी थेट बँक हस्तांतरण द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## मध्यपूर्वेतील भडका

इस्रायलचे गाझापट्टीतील हमासविरुद्धचे युद्ध किंचित निवळत असतानाच आता इस्रायल विरुद्ध इराण संघर्ष पुन्हा पेटला आहे. अणू कार्यक्रम थांबवावा, यासाठी अमेरिकेने केलेले आवाहन इराणने धुडकावून लावले. आमच्या अणू कार्यक्रमाबद्दलचा निर्णय आम्ही घेऊ. इतरांनी त्यात नाक खुपसू नये, ही इराणची भूमिका. या पार्श्वभूमीवर इस्रायलने इराणच्या आण्विक आणि क्षेपणास्त्र तळांनाच लक्ष्य केले. या हल्ल्यात इस्रायलच्या दोनशेहून अधिक लढाऊ विमानांचा समावेश होता. 'मोसाद' या इस्रायलच्या गुप्तचर संस्थेने स्फोटकांनी सज्ज ड्रोन हल्ल्याआधीच इराणमध्ये पेरून ठेवले. हल्ल्यानंतर तेहरानजवळील क्षेपणास्त्र प्रक्षेपकांना निकामी करण्यासाठी हे ड्रोन सक्रिय करण्यात आले. अजूनही हल्ले सुरूच आहेत. इराणमधील नतांज येथील आण्विक सुविधा केंद्रासह इतर प्रमुख लक्ष्ये भेदण्यात आली. हल्ला कमालीचा यशस्वी झाल्याचा दावा इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केला असून, इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र यंत्रणेला उद्ध्वस्त केले, असे त्यांनी म्हटले आहे. इस्रायलने हा आक्रमक पवित्रा का धारण केला, असा प्रश्न कोणाच्याही मनात येईल; पण इराणचा आण्विक कार्यक्रम इस्रायलच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणारा आहे, असे नेतान्याहू यांनी म्हटले आहे.

इस्रायलचे आगामी नियोजित हल्ले टाळायचे असतील, तर इराणने अणू कार्यक्रमाबाबत अमेरिकेशी करार करावा, अन्यथा सर्वच संपुष्टात येईल आणि इराणच शिल्लक राहणार नाही, अशी उघड धमकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. इराणनेही इस्रायलची राजधानी तेलअवीवसह महत्त्वाच्या शहरांवर हल्ले केले. त्यासाठी १०० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर केला गेला. जेरुसलेम शहरावरही ड्रोन हल्ले करण्यात आले. उलट इराणचे ड्रोन पाडल्याचा दावा इस्रायलने केला. इराणने प्रत्युत्तरात्मक कारवाईला 'ऑपरेशन ट्रू प्रॉमिस-३' असे नाव दिले आहे. अण्वस्त्र प्रसारबंदी विषयक कोणतेही निर्बंध इराण पाळत नसल्याचे 'इंटरनॅशनल अ‍ॅटॉमिक एनर्जी एजन्सी'च्या (आयएईए) बोर्ड ऑफ गव्हर्नन्सने नुकतेच ठरावाद्वारे जाहीर केले आहे. इराण तीन ठिकाणी गुप्तपणे अण्वस्त्र विकसित करत असल्याचे आयएईएच्या तपासात आढळून आले. इराण अण्वस्त्रसज्ज झाल्यास इस्रायल संकटात सापडू शकतो म्हणून त्याआधीच हे हल्ले केल्याचा युक्तिवाद इस्रायलने केला आहे.

नतांज येथील आण्विक पायाभूत व्यवस्थांचे जबरदस्त नुकसान इस्रायलने केले. अर्थात, त्यामध्ये जेथे युरेनियम समृद्ध केले जाते, अशा सेंट्रिफ्युज हॉल्सची हानी झाली की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. तसेच फोर्डो येथील आण्विक समृद्धीकरणाचा प्रकल्प अद्याप इस्रायलच्या हल्ल्याचे लक्ष्य ठरलेला नाही. हा संपूर्ण प्रकल्प भूमिगत असून, त्याला हानी पोहोचवणे तसे कठीण आहे; मात्र तीन प्रमुख सेनाधिकार्‍यांना ठार मारण्यात आल्यामुळे इराणच्या लष्करात पोकळी निर्माण झाली आहे. शिवाय, इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाशी संबंधित दोन वैज्ञानिकांनाही ठार मारण्यात आले. इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांनी अमेरिकेसोबत बोलणी करण्यासाठी ज्यांची नियुक्ती केली होती, ते बडे राजकीय नेते अली शमखानी यांचीही इस्रायलने हत्या केली. इराणचे अणुसंशोधन केंद्र आणि महत्त्वाच्या लष्करी आस्थापना भस्मसात करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. थोडक्यात, इराणच्या इस्लामिक सत्तेसमोरचे हे सर्वात मोठे संकट आहे; मात्र त्यामुळे इराणचे लष्करी सामर्थ्य खामेनी दावा करतात, तेवढे नाही, हे स्पष्ट झाले आहे. यापूर्वीही इस्रायलने इराणवर हल्ले केले होते आणि इराणच्या मर्यादा दाखवून दिल्या होत्या. इतिहासात डोकावले, तर लक्षात येईल की, १४ मे १९४८ रोजी इस्रायलने स्वतंत्र प्रजासत्ताकाची स्थापना केली आणि पॅलेस्टिनींना आपल्याच भूमीवरून हुसकावून लावण्यास सुरुवात केली. त्यानंतर भोवतालचे जॉर्डन, सीरिया, इजिप्त आदी देश पॅलेस्टिनींच्या मदतीसाठी पुढे आल्यावर घमासान युद्ध सुरू झाले आणि ते १९४९ अखेरपर्यंत चालले. अमेरिका-बि-टनचा वरदहस्त मिळालेल्या इस्रायलने या युद्धात ७७ टक्के भूभागावर ताबा प्राप्त केला. झायोनिस्ट ज्यू व ख्रिश्चनांच्या धारणांच्या अनुषंगाने इस्रायलची निर्मिती झाली, तरी साम-ाज्यवादी अमेरिका-बि-टनची रणनीती त्यामागे दडलेली होती. पश्चिम आशियात इस्रायलच्या रूपाने एक शक्ती उदयास आली. आशियातील राजकारणावर व तेलसाठ्यांसारख्या नैसर्गिक स्रोतांवर नियंत्रण मिळवण्यासाठी अमेरिकेसारख्या देशास एकप्रकारे तेथे तळच निर्माण करता आला. इस्रायल-अमेरिकेची मैत्री तेव्हापासूनची आहे. वास्तविक, इस्रायलने केलेल्या या हल्ल्याशी आमचा काहीही संबंध नाही, असे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी सूचित केले आहे. उलट ट्रम्प यांनी मात्र इराणला चांगलाच धडा शिकवला, असे म्हणत नेतान्याहूंचे कौतुक केले आहे.

अर्थात, ट्रम्प पर्वात अमेरिकेतील विविध नेत्यांच्या वक्तव्यांमधील विसंगती नेहमीच प्रकट होत आहेत. हमासने इस्रायलवर हल्ला केला, त्याचा बदला म्हणून इस्रायलने गाझापट्टीत एवढा विध्वंस केला की, त्यात हजारो सामान्य नागरिकही भरडले गेले. वास्तविक, २०१५ मध्ये इराण आणि संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा मंडळाच्या पाच सदस्यांमध्ये सहमती झाली होती; पण त्यावेळी इस्रायलच्या नादी लागून ट्रम्प यांनी इराणसोबतच्या आण्विक करारातून बाहेर पडण्याचा चुकीचा निर्णय घेतला. वाटाघाटी करून नाही, तर सत्तापालट करूनच इराणमध्ये योग्य ते परिवर्तन घडेल, अशी ट्रम्प आणि नेतान्याहू यांची भूमिका आहे. वाटाघाटी, सहमती आणि आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांचा दबाव या माध्यमातूनच शांतता निर्माण होऊ शकते. युद्धखोरीतून परस्परांची हानी तर होतेच, त्याचे परिणाम जगभरातील अर्थव्यवस्थांवर होत असतात. त्याची सुरुवात झालेली दिसते. खनिज तेलाचा भडका उडाला असून, शेअर बाजार कोसळले आहेत. तेलाचे भाव वाढल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात बाधा येण्याचा धोका संभवतो. जागतिक अर्थव्यवहारांना त्याची मोठी झळ बसू शकते. युद्धामुळे होणारा विनाश मानवजातीवर भरून न येणारे घाव सोडत असतो. या स्थितीत अण्वस्त्रधारी इराणच्या महत्त्वाकांक्षेला आणि इस्रायलच्या युद्धखोरी धोरणाला वेसण घालण्याचे मोठे आव्हान आहे.

# नवी मुंबई विमानतळ अदानीचा का? कुणामुळे? कसा होतो?



गुजरात मधील विमान अपघाताची चर्चा आज सर्वत्र सुरू आहे.लोक सरकारला सातत्याने प्रश्न विचारताहेत.या अपघाताला जबाबदार कोण? मा.केंद्रीय गृहमंत्री उत्तर देतात. असे अपघात टाळता येत नाहीत. एकप्रकारे निष्पाप जीवांच्या अपघाती मृत्यूचे हे समर्थन आहे का?. ज्यांचे नातेवाईक यात मृत्युमुखी पडले त्यांचे,त्यांच्या कधीही न संपणाऱ्या वेदनांचे,समाधान यातून होत नाही.आता आत्मा अमर आहे.या भगवतगीतेच्या ओळी समोर ठेऊन काही संत महंतांच्या रील्स सोशल मीडियावर येऊ लागल्यात.पहलगाम हल्ल्यानंतर अशीच सिन्दुर प्रचार प्रसार स्थिती होती.



निवडणुकांत जिंकलेल्या मोदी सरकारला लोक प्रश्न विचारत होते.ईव्हीएम ने दिलेल्या चमत्कारिक निकाला बद्दल?.प्रामाणिक मानवी मनाच्या प्रश्नांना,सत्यवादी लोकशाही उत्तरे मिळत नव्हती.दस्तुर खुद्द गुजरातमध्ये माजी मुख्यमंत्र्यांसह अनेक निष्पाप लोक मृत्युमुखी पडल्याने,लोक अधिकाधिक प्रश्न विचारत आहेत. ते चुकीचे नाहीत.लोकांनी प्रश्नच विचारू नयेत ही मनुस्मृती धर्माची मागणी असते.अंध श्रद्धा हाच या अत्याचारी विषमतावादी धर्मांधांचा मूळ विचार आहे. जगात मात्र लोक सरकारला प्रश्न विचारतात.मागील दोन दशके तर्कहीन सरकारी उत्तरे ऐकून देश थकला आहे.परंतु देशाचा विरोधी पक्ष असो की सामान्य जनता,निवडणुकीतल्या चमत्कारिक मोदी विजया पुढे निरुत्तर होत आहे.वेद,उपनिषदे,गीता,पुराणे,मनुस्मृती घेऊन निघालेल्या वैदिक हिंदुत्वाने निर्माण केले प्रश्नअगाध आहेत.अनंत आहेत.कोरोना,नोटबंदी,रेल्वे, विमान,पहेलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या नातेवाईकांना,धर्माच्या तत्वद्न्यातून अशी उत्तरे देता येतील का? दिली तर ती लोकांना पटतील का?.व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात,असे अनेक प्रश्न माझ्यासारख्या सामान्य नागरिकांना आहेत.मोदी सरकार आल्यापासून देशातील महत्वाची बंदरे,विमानतळे,मोक्याच्या जमिनी अदानी,अंबानी,लोढा,या मोजक्या उद्योगपतीं च्या कशा होत आहेत?. खरोखरच गुजरातचे लोक महान बुद्धिमत्तेचे आणि कर्तृत्ववान आहेत का?.आम्ही महाराष्ट्राचे लोक त्यातही नवी मुंबई पनवेल,उरण रायगडचे आगरी कोळी कराडी ओबीसी मूर्ख आहोत का? नवी मुंबई विमानतळातील झालेला अन्याय,प्रकल्पग्रस्त मच्छीमार शेतकरी आदिवासी यांचे नेतृत्व करताना आलेले,माझ्या जीवनातील अपयश हे मला चिंतनात टाकते आहे.

लोकांकडे या प्रश्नाची उत्तरे मी जाहीरपणे आज मागत आहे. शिक्षकाची नोकरी करीत असताना,ज्या अडचणींना सामोरे जात मी अंतिमतः नोकरी सोडायला तयार झालो.त्या पाठीमागच्या कारणांचा अभ्यास केल्यानंतर मला समजले की उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य मानसिकते च्या शासन प्रशासनात ओबीसी एससी एसटी स्त्रिया यांना त्रास का होतो?.माझ्या व्यक्तिगत चुकांचे हे समर्थन नाही.तर आजच्या देशाच्या मनुवादी परिस्थितीशी आम्ही जुळवून घेतो ? की होणारा अन्याय,चुकीचे लादलेले निर्णय याविरुद्ध आम्ही संघर्ष करतो? यात आहे.मी नोकरी सोडल्यानंतरही आपली नोकरी पूर्ण करून सुखाने निवृत्ती स्वीकारलेले माझे अनेक सहकारी मी पाहतो आहे.त्यांना असे जाणवले नसावे का? २०१३ साली नवी मुंबई विमानतळ भूसंपादनाची घोषणा शासनाकडून करण्यात आली.मी २००५साली शिक्षकी पेशा सोडून शेतकरी आंदोलनात आलो होतो. २००६ साली सेझ विरोधी आंदोलनात ड.दत्ता पाटील यांच्या सोबत उतरलो होतो.त्यानंतर सिडको विरोधी आंदोलनात लोकनेते दि बा पाटील यांच्या नेतृत्वात माझ्यासह अनेक लोक या उत्स्फूर्तपणे उतरले होते.२०१३ सालात लोकनेते दि बा पाटील आम्हाला सोडून गेले.याच वर्षी नवीन भूसंपादन कायदा २०१३ आला.या कायद्यानुसार भूसंपादन व्हावे यासाठी आजपर्यंत माझ्यासह अनेकांनी संघर्ष केला.या नव्या कायद्यात भूमिहीन शेतकरी ताबा,कब्जा कुळवही वाट करणाऱ्या ओबीसी एससी एसटी आणि समुद्रावर, जंगलात उपजिविका करणाऱ्या मच्छीमार आदिवासींना चार पट मोबदला,प्रकल्पग्रस्त दाखले सरकारी नोकऱ्या,पुनर्वसन घरे विकसित जमिनी,व्यावसायिक पुनर्वनं होते. सिडको संपादित जमिनीचा विक्री भाव नेरूळ सानपाडा येथे प्रति गुंठा चार ते पाच कोटी रुपये असताना.याच्या चार पट भाव शेतकऱ्यांना देताना अदानीने डोळे पांढरे केले असते.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर नारायण नागू पाटील यांचा कुळ कायदा,सोशल इंम्पक्त रिपोर्ट करून मा.जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नवा भूसंपादन कायद्याने पुनर्वसन म्हणून मिळणार होता.लोकनेते दि बा पाटील यांचे साडे बारा टक्के सिडको पुनर्वसन धोरण सोबत होतेच. हे सारे नाकारून,साडे बावीस टक्के सिडको भुखंड योजना शेतकऱ्यांची फसवणूक करण्यासाठी आणली गेली.जगातील सर्वोत्कृष्ट सिडको योजना असा प्रचार आमदार खासदार करीत होते.सिडकोतील आयएस अधिकारी,आमचे ठेकेदार राजकीय नेते,महाराष्ट्र सरकार,केंद्र सरकार यांनी अदाणीसाठी भूमिपुत्रांना हातोहात फसविले.नवी मुंबई विमानतळाचे कायदेशीर भूसंपादन हे भूसंपादन कायदा २०१३ने व्हायला हवे होते.ते परस्पर शेतकरी संमतीपत्र,दलाली याच्या माध्यमातून लिहून घेऊन लोकांची फसवणूक सिडको महाराष्ट्र सरकारने केली.असे मां उच्च न्यायालयाने अलीकडेच म्हटले आहे.यामुळे हजारो आगरी कोळी कराडी ओबीसी मागासवर्गीय लोक आपल्या राहत्या घरांच्या पुनर्वसनास मुकले आहेत.मच्छीमार आदिवासी,अल्पसंख्याक हे उध्वस्त झाले आहेत.आगरी कोळी कराडी यांचे अतोनात नुकसान झाले,रेती मासेमारी,शेती,खडी हे व्यवसाय गेले.

लोकनेते दि बा पाटील यांच्या संघर्षातून साडेबारा टक्के विकसित भुखंड,सरकारी नोकऱ्या,वाढीव भाव मिळत होता.आता (नवा भूसंपादन कायदा २०१३) धाब्यावर बसवून हा विमानतळ अदानीच्या मालकीचा केला गेलाय.हजारो कोटींचा हा भ्रष्टाचार आहे.एका खाजगी उद्योगपतीच्या अदानीच्या विमानतळासाठी सरकार,राजकीय नेते,राजकीय पक्ष,जिल्हा प्रशासन,पोलिस यांनी दलाली केली,लोक फसले आहेत. फसवले गेले आहेत.त्यातून अदानी श्रीमंत आणि आम्ही गरीब झालोय.हा आमच्या नशिबाचा दोष नाही.हे संघटित षडयंत्र आहे.मनुवादी फसवणूक आहे.स्त्रीशुद्राती शूद्र यांची फसवणूक करूनच ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या मनुस्मृतीचे राज्य बिनबोभाट चालते.

छत्रपती शिवराय,महात्मा फुले,सावित्रीमाई फुले,राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,नारायण नागू पाटील,ड दत्ता पाटील,लोकनेते दी बा पाटील यांच्या विचारांचा पराभव करून रायगड या छातीवर अदानी ने विमानतळ बांधलाय.तो अदानी सहज लोकनेते दि बा पाटील यांचे नाव देईल का?.आज लोकनेते दि बा पाटील साहेब असते,तर रायगड जिल्ह्यात येणाऱ्या नैना प्रकल्पासह,अलिबाग कॉरिडॉर,रेवस करंजा पूल,एम एम आरडीए.एमआयडीसी येथे भूसंपादन कायदा २०१३ने भूसंपादन आणि पुनर्वसन मागितले असते.संघर्षाने करून घेतले असते.आज ती जबाबदारी तुमची आमची नाही का?


भारतीय संविधानाच्या आग्रहा साठी लढण्याचा संकल्प करून या लढाईत आम्ही सर्व आगरी कोळी कराडी भंडारी आदिवासी ईस्ट इंडियन ओबीसी एससी एसटी मुंबई ठाणे रायगड पालघर सह महाराष्ट्रात,घरे गावठाणे,व्यवसाय यांच्या अधिकारांचा संघर्ष करतोय.फसवून घेतलेली आमची जमीन समुद्र, जंगले येथे होत असलेल्या क्षणिक पराभवाने आम्ही सोडणार नाहीत.खचणार नाही.या लेखाने मी आपणास मदतीसाठी हाक देतोय.भारतीय संविधानाच्या हक्काचा जमिनीवरचा संघर्ष पेटता ठेवण्यासाठी.सर्वप्रकारच्या मदतीचा हात द्या.सहकार्यासाठी उभे रहा.निसर्ग आपल्या सोबत आहे.तथागत बुद्ध,चार्वाक,महावीर यांनी भारताला दिलेला तर्क,वैज्ञानिक विचार लोकां मध्ये आजही टिकून आहे.त्यासमोर अस्तित्वहीन स्वर्ग,नरक,आत्मा,चमत्कार आणि देवही टिकणार नाहीत.टिकतील भारताचे आम्ही सर्व लोक.अर्थात,श ीहश शिेश्रिश `ष ळपवळर अखंड भारताचा विजय असो.

******

राजाराम पाटील -
८२८६०३१४६३.
उरण,जिल्हा रायगड.

# द अनटोल्ड स्टोरी

सी. शंकरन नायर कोण आणि त्यांच्या जीवनावर सिनेमा यावा असं त्यांच्या जीवनात काय घडलं, अशा प्रश्नांचे उत्तर म्हणजे 'द अनटोल्ड स्टोरी ऑफ जालियनवाला बाग. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एकाहून अधिक त्यागी आणि ज्ञानी व्यक्तींनी जबरदस्त योगदान दिलेले दिसून येते. यातील एक वेगळं, फारसं प्रसिद्ध नसलेलं पण फार महत्त्वाचं नाव म्हणजे सर सी. शंकरन नायर. हे नाव उच्चारल्यावर डोळ्यांसमोर येते ती १३ एप्रिल १९१९ रोजी पंजाब प्रांतातील अमृतसर शहरातल्या जालियनवाला बागमध्ये घडलेल्या हत्याकांडाची. आता गेलेल्या एप्रिल महिन्यात या घटनेला १०६ वर्षं पूर्ण झाली. त्याच्या आसपास




म्हणजे १८ एप्रिल २०२५ रोजी सी. शंकरन नायर यांच्या जीवन आणि कार्याबद्दल चित्रपट प्रदर्शित झाला. 'केसरी चॅप्टर टू : द अनटोल्ड स्टोरी ऑफ जालियनवाला बाग' या चित्रपटाचा तेलुगू अवतार २३ मे रोजी प्रदर्शित झाला. अशा स्थितीत हे सी. शंकरन नायर कोण आणि त्यांच्या जीवनावर सिनेमा यावा असं त्यांच्या जीवनात काय घडलं, असे प्रश्न मनात आल्यावाचून राहात नाही. त्यांची कन्या लेडी माधवन नायर यांनी १९६६ साली 'द ऑटोबायोग्राफी ऑफ सर सी. शंकरन नायर' पुस्तक प्रसिद्ध केले. सी. शंकरन नायर यांच्या योगदानाबद्दल जाणून घेण्याअगोदर अगदी थोडक्यात जालियनवाला बागेतील घटनेबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. पहिले महायुद्ध १९१८ साली संपले. या युद्धातभारतीय सैनिकांनी अलौकिक पराक्रम गाजवून इंग्रजी साम्राज्याला विजय मिळवून दिला. त्यामुळे आता इंग्रज सरकार आपल्या स्वातंत्र्याबद्दलच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करेल अशी भारतीयांची अपेक्षा होती. या अपेक्षांऐवजी त्यांच्यासमोर आला १९१९ सालचा 'काळा कायदा' ज्याला 'रौलेट कायदा' असे म्हणतात. सर सिडनी रौलट यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीने असा कायदा करण्याची सूचना केली होती. म्हणून या कायद्याला 'रौलट कायदा' म्हणतात. या कायद्यातील तरतुदी इतक्या भयानक होत्या की महात्मा गांधींनी या विरोधात देशव्यापी सत्याग्रह सुरू केला.

या देशव्यापी निषेधाचा भाग म्हणून पंजाब प्रांतातील अमृतसर शहरातील जालियनवाला बागेत १९ एप्रिल १९१९ रोजी जाहीरसभा आयोजित केली होती. या सभेसाठी शेकडो स्त्री-पुरुष गोळा झाले होते. जालियनवाला बागेची रचना अशी होती की ही बाग तिन्ही बाजूंनी बंदिस्त आणि येण्या--जाण्यासाठी एक छोटीशी वाट आहे. भारतीय समाजात भीती निर्माण व्हावी या हेतूने इंग्रज अधिका-यांनी या निःशस्त्र लोकांवर अंदाधुंद गोळीबार केला. यात ३७९ ते १५०० निरपराध लोक मारले गेले. या घटनेचे देशभरच नव्हे तर जगभर पडसाद उमटले. रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना इंग्रजांनी दिलेली 'सर' ही पदवी निषेध म्हणून परत केली.

आता या प्रकरणाशी केरळ राज्याचे रहवासी असलेल्या सर सी. शंकरन नायर यांचा संबंध कसा येतो? यासाठी नायर यांच्या जीवनातील काही तपशील थोडक्यात माहिती पाहिजे. नायर यांनी मद्रास येथून वकिलीची पदवी मिळवली होती. महाविद्यालयीन जीवनापासून बुद्धीची चमक दाखवायला सुरुवात केली होती. त्यांनी मद्रास उच्च न्यायालयातील नामवंत इंग्रज वकील सर होरेशियो शेफर्ड यांचे मदतनीस म्हणून कामाला सुरुवात केली. सर शेफर्ड नंतर मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झाले. या दरम्यान नायर यांचा एक हुशार वकील म्हणून नावलौकिक व्हायला लागला होता. एकदा एक इंग्रज न्यायमूर्ती हॉलोवे म्हणाले 'इंग्रजांवर कधी कोणी राज्य केले नाही'.

तेव्हा नायर यांनी ताबडतोब फ्रेंचांनी कसं इंग्रजांचा पराभव करून त्यांना गुलाम केले होते, याची माहिती सादर केली. नायर यांना दूरदृष्टी होती. त्यांना फक्त राजकीय स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते तर सामाजिक-आर्थिक स्वातंत्र्यसुद्धा अपेक्षित होते. त्यांना पाश्चात्य समाजात असलेली समानता प्रिय होती. त्यांनी १९११ साली एका लेखात लिहिले होते

त्या काळच्या देशप्रेमी वकीलांप्रमाणे नायर एका बाजूला वकिली करत होते तर दुसरीकडे स्वातंत्र्यलढ्यात तसेच सामाजिक सुधारणांच्या कार्यात व्यस्त होते. १८९७ साली ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले. तोपर्यंत काँग्रेसच्या इतिहासातील 'सर्वात तरुण अध्यक्ष' असे त्यांचे वर्णन केले जात होते. त्यांचे वकिलीतील कौशल्य बघून इंग्रज सरकारने त्यांना १९०८ साली मद्रास उच्च न्यायालयात न्यायमूर्तिपदी नेमले. त्यांनी अनेकदा आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

त्यांना भारताला स्वयंनिर्णयाचा अधिकार असावा असे वाटत होते. १९१९ सालच्या भारत सरकार कायद्याने आपल्या देशात प्रांतांच्या पातळीवर द्विदल पद्धत सुरू केली. मात्र एप्रिल १९१९ मध्ये घडलेल्या जालियानवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी व्हाइसरॉयच्या कायदेमंडळाचा राजीनामा दिला. असे असले तरी त्यांना महात्मा गांधींची १९२० सालची असहकाराची चळवळ अजिबात मान्य नव्हती. एवढेच नव्हे तर त्यांनी १९२२ साली 'गांधी अँड अनार्की' असं पुस्तक लिहून मतभेद समाजासमोर ठेवले. शिवाय जालियनवाला बाग हत्याकांड घडले तेव्हा पंजाब प्रांताचे राज्यपाल असलेल्या सर मायकेल ओ'डायरच्या विरोधातसुद्धा त्यांनी लेखन केले. नायर यांच्या मते, जालियनवाला बाग येथे घडलेल्या शोकांतिकेची सर्व जबाबदारी राज्यपाल म्हणून मायकेल ओ'डायर यांच्या शिरावर येते.

हे आरोप बघून मायकेल ओ'डायर यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानी खटला भरला. मात्र हा खटला त्यांनी इंग्लंडमध्ये दाखल केला. हा खटला लंडन येथील न्यायालयात सुमारे सहा आठवडे चालला. यात बारा सभासद असलेले ज्युरी होते. हे सर्व इंग्रज होते. अध्यक्षपद न्यायमूर्ती सर हेन्री मॅककर्डी यांच्याकडे होते. त्यांनी सुरुवातीपासून मायकेल ओ'डायर यांच्याबद्दलची सहानुभूती लपवून ठेवली नाही. यातील अकरा ज्युरींनी 'नायर दोषी आहेत' असा निर्णय दिला. असा निर्णय न देणारे एकमेव इंग्रज म्हणजे सर हेराल्ड लास्की. हे गृहस्थ समाजवादी विचारांचे होते आणि नामवंत अर्थतज्ज्ञ. त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिक्स' सुरू केले होते.


ज्युरींच्या निर्णयानुसार सी. शंकरन नायर यांना पाचशे पाउंड एवढा दंड आणि खटल्याचा खर्च द्यावा असे जाहीर करण्यात आले. मायकेल ओ'डायर यांनी सांगितले की जर नायर यांनी त्यांची माफी मागितली तर ते दंडाची रक्कम माफ करायला तयार आहेत. देशभक्त आणि कमालीचे स्वाभिमानी असलेल्या नायर यांनी माफी मागण्यास नकार दिला. हा खटला कमालीचा गाजला. याचे पडसाद ५३ देशांत पसरलेल्या ब्रिटीश साम्राज्यातील जनतेवर झाला. 'आम्ही निःस्पृह आहोत' अशा डिंगा मारणा-या ब्रिटीश साम्राज्याचा हिडीस चेहरा जगासमोर आला. नायर यांना १९३४ साली वयाच्या ७७व्या वर्षी मृत्यूने गाठले.

सी. शंकरन नायर यांचे जीवन आणि कार्य चित्रपटातून मांडण्यात आले आहे. आजपर्यंत स्वातंत्र्यलढ्यातील अनेक नेत्यांवर चित्रपट तयार झाले आहे. त्या नेत्यांचे जीवन आणि कार्य चित्रपटांतून दाखविले आहे. आता सी. शंकरन नायर या काहीशा विस्मृतीत गेलेल्या नेत्याच्या जीवनावर चित्रपट आल्यामुळे तरुण पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होईल.

# पित्ताशयात वाढतील खड्डे! रोजच्या आहारात चुकूनही करू नका ‘या’ पदार्थांचे सेवन, शरीरात सतत वाढेल पित्त

दैनंदिन आहारात सतत तेलकट किंवा मसालेदार पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. यामुळे पोटात वाढलेली जळजळ, ॲसिडिटी, अपचन, गॅस इत्यादी अनेक आरोग्यसंबंधित समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने किंवा मेडिकलमध्ये उपलब्ध असलेल्या गोळ्यांचे सेवन करावे. गोळ्यांचे सेवन केल्यामुळे काही वेळा पुरता आराम मिळतो, मात्र पुन्हा एकदा अपचनाची समस्या उद्भवू लागते. आयुर्वेदामध्ये सांगितल्यानुसार, शरीरात पित्त वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. पित्तदोष म्हणजे शरीरातील अग्नी किंवा उष्णतेचा असंतुलित प्रवाह. पित्ताच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी आहारात कोणत्याही चुकीच्या पदार्थांचे सेवन करू नये.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पित्ताची समस्या प्रामुख्याने उद्भवते. शरीरात वाढलेले पित्त आरोग्याला हानी पोहचवते. शरीरात साचून राहिलेल्या विषारी घटकांमुळे आरोग्यासंबंधित अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे पोट स्वच्छ असणे आवश्यक आहे. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला शरीरात पित्त वाढू नये म्हणून आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे पदार्थ पोट आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरतील. पित्त वाढल्यानंतर दुर्लक्ष केल्यास शरीराला आणखीनच हानी पोहचते.





दही, ताकाचे सेवन: उन्हाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये दही ताकाचे सेवन केले जाते. यामुळे शरीराला थंडावा मिळतो आणि शरीर हायड्रेट राहते. पण अतिप्रमाणात दही ताकाचे सेवन केल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. आयुर्वेदामध्ये सांगितल्यानुसार, रात्री किंवा जेवणानंतर लगेच दही खाल्यामुळे पोटात ॲसिडिटी वाढू लागते. दह्यामध्ये असलेला आंबटपणामुळे त्यात सजीव सूक्ष्मजंतू तयार होतात, ज्याचा परिणाम पचनक्रियेवर लगेच दिसून येतो. त्यामुळे दही ताकाचे सेवन कोणत्याही वेळी करू नये.

आंबट फळांचे सेवन: विटामिन सी युक्त आंबट फळे शरीरासाठी अतिशय गुणकारी आहेत. या फळांच्या सेवनामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. आहारात संत्री, मोसंबी, अननस, आंबट कैरी किंवा लिंबाच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीरात जळजळ वाढणे किंवा आम्लिपत्ता तयार होते. हे पित्त शरीरासाठी अतिशय हानिकारक आहे. शरीरात पित्त साचून राहिल्यामुळे पित्ताचे खड्डे होण्याची जास्त शक्यता असते.

मसालेदार पदार्थ: रोजच्या आहारात कमीत कमी प्रमाणात मसालेदार, तिखट, तेलकट पदार्थ खावे. मसालेदार पदार्थांच्या सेवनामुळे शरीराची पचनक्रिया बिघडून जाते. बटाटेवडे, समोसे, पकोडे इत्यादी तळलेले आणि मिरची, हिंग, गरम मसाले वापरून तयार केलेल्या पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन करू नये. शरीरात वाढलेल्या ॲसिडिटीमुळे छातीमध्ये सतत जळजळ होणे, छातीमध्ये वेदना, व्यवस्थित झोप न लागणे, चिडचिड होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात.

## सकाळचा नाश्ता होईल स्पेशल! १० मिनिटांमध्ये झटपट बनवा चीज कॉर्न मॅगी, नोट करून घ्या रेसिपी



सकाळच्या नाश्त्यात नेहमीच कांदापोहे, उपमा, शिरा खाऊन सगळ्यांचं कंटाळा येतो. रविवारी घरात सर्वच सदस्यांची सुट्टी असते. त्यामुळे नाश्त्यात प्रत्येक व्यक्तीला काहींना काही चमचमीत पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये चीज कॉर्न मॅगी बनवू शकता. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं मॅगी खायला खूप आवडते. मॅगीचे नाव ऐकल्यानंतर मुलं अतिशय आनंदाने नाचू लागतात. पण नेहमीच साध्या पद्धतीमध्ये बनवलेली मॅगी खाऊन कंटाळा आल्यास तुम्ही झटपट मक्याचे दाणे आणि इतर भाज्या टाकून मॅगी बनवू शकता. चला तर जाणून घेऊया सोप्या पद्धतीमध्ये चीज कॉर्न मॅगी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
- लसूण
- मॅगी
- कांदा
- चीज
- मक्याचे दाणे
- लाल तिखट
- मॅगी मसाला
- मेयॉनीज
- कोथिंबीर
- हिरवी मिरची

कृती: चीज कॉर्न मॅगी बनवण्यासाठी सर्वप्रथम, भाज्या स्वच्छ साफ करून बारीक चिरून घ्या . मक्याचे दाणे हलकेसे शिजवा.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला लसूण, कांदा आणि चवीनुसार मीठ घालून लालसर भाजून घ्या.

कांदा शिजल्यानंतर त्यात शिजवून घेतलेले मक्याचे दाणे आणि शिमला मिरची घालून मिक्स करा.


नंतर त्यात लाल तिखट, मॅगी मसाला घालून आवश्यकतेनुसार पाणी घालून शिजवून घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात मॅगी शिजण्यासाठी टाका.

मॅगी शिजल्यानंतर त्यात मेयॉनीज आणि चीज टाकून व्यवस्थित मिक्स करा. सगळ्यात शेवटी वरून बारीक चिरलेला कोथिंबीर टाकून सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली चीज कॉर्न मसाला मॅगी.

## ला झालाय किती धोकादायक आहे ‘हा’ आजार; जाणून घ्या ६ लक्षणे






टीव्ही अभिनेत्री आणि बिग बॉस ओटीटी-३ विजेती सना मकबूल हिला लिव्हर सिरोसिस झाल्याचे निदान झाले आहे. ती काही काळापासून ऑटोइम्यून हेपेटायटीसने ग्रस्त आहे, जो एक क्रोनिक लिव्हरचा आजार असून यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती लिव्हरवर हल्ला करते. सना गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात असून तिने स्वतः याबाबत सोशल मीडियावर माहिती दिली होती. ही माहिती मिळाल्यापासून तिचे चाहते आणि नातेवाईक लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत आहेत. सना केवळ ३२ वर्षांची असून नक्की हा आजार कसा झाला आणि याची लक्षणे कशी ओळखू शकता याबाबत आपण या लेखाद्वारे माहिती घेऊया. ने केलेल्या अभ्यासानुसार आपण याची अधिक माहिती घेऊया लिव्हर सिरोसिस म्हणजे काय? लिव्हर सिरोसिस हा एक गंभीर आजार आहे ज्यामध्ये डळींशी च्या पेशी खराब होतात आणि हळूहळू डागांच्या ऊतींमध्ये बदलतात. हे डाग यकृताच्या सामान्य कार्यावर परिणाम करतात, ज्यामुळे रक्त स्वच्छ करणे, विषारी पदार्थ काढून टाकणे आणि पचन यासारख्या शरीराच्या आवश्यक कार्यांवर परिणाम होतो. लिव्हर सिरोसिससाठी प्रमुख जोखीम घटकांमध्ये दीर्घकालीन मद्यपान, व्हायरल हेपेटायटीस (बी आणि सी), फॅटी यकृत रोग आणि ऑटोइम्यून हेपेटायटीस यांचा समावेश आहे. ऑटोइम्यून हेपेटायटीस आणि लिव्हर सिरोसिस ऑटोइम्यून हेपेटायटीस ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून निरोगी लिव्हर पेशींवर हल्ला करते, ज्यामुळे लिव्हरची जळजळ (हिपॅटायटीस) होते. जर या जळजळीवर वेळीच उपचार केले गेले नाहीत तर ते दीर्घकालीन नुकसान करते ज्यामुळे लिव्हर सिरोसिस होतो. ऑटोइम्यून हेपेटायटिस हा आजार महिलांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येतो आणि त्याची लक्षणे थकवा, सांधेदुखी आणि कावीळ असू शकतात. उपचाराशिवाय, हा रोग यकृताची रचना कायमची नष्ट करू शकतो. लिव्हर सिरोसिसची सुरुवातीची लक्षणे

लिव्हर सिरोसिसची सुरुवातीची लक्षणे अनेकदा स्पष्ट नसतात, ज्यामुळे त्याचे निदान उशिरा होऊ शकते. सामान्य लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे:- सतत थकवा आणि अशक्तपणा भूक न लागणे आणि वजन कमी होणे कावीळ (त्वचा आणि डोळे पिवळे होणे) त्वचेवर खाज सुटणे पोटदुखी किंवा सूज सहज जखम होणे किंवा रक्तस्त्राव त्वचेला येतेय खाज आणि जाणवत असतील ५ संकेत, तर डळींशी सडून गंभीर आजार होण्याची शक्यता काय काळजी घ्यावी लिव्हर सिरोसिस टाळण्यासाठी वेळेवर निदान आणि जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. तुम्ही कोणते उपाय करावेत याची माहिती घ्या अल्कोहोल सोडा: जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने यकृताचे नुकसान होते. म्हणून, हे दुष्परिणाम पूर्णपणे टाळणे महत्वाचे आहे निरोगी आहार: संतुलित आणि कमी चरबीयुक्त अन्न खा. फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य लिव्हरसाठी फायदेशीर आहेत नियमित तपासणी: जर तुम्हाला ऑटोइम्यून हेपेटायटीस किंवा इतर जोखीम घटक असतील तर नियमितपणे यकृत कार्य चाचण्या करा व्हायरल हेपेटायटीस प्रतिबंध: हेपेटायटीस बी आणि सी साठी लसीकरण करा आणि सुरक्षिततेच्या सवयींचा अवलंब करा औषधे सावधगिरीने वापरा: डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नका, कारण काही औषधे यकृताला हानी पोहोचवू शकतात वजन नियंत्रण: लठ्ठपणामुळे फॅटी लिव्हरचा आजार होऊ शकतो, म्हणून नियमित व्यायाम करा आणि निरोगी वजन राखा

# पाण्याच्या एका घोटानेच छातीत साचलेलं सर्व पित्त येईल बाहेर, काही सेकंदातच सिडिटीने फुगलेलं पोट होईल रिकामं





आजकालच्या धावपळीच्या जगात अनेकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी फार बिघडल्या आहेत. आपल्या आहाराकडे दुर्लक्ष करत सतत खाल्ल्या जाणाऱ्या फास्ट फूडच्या सेवनाने आपली पचनक्रिया डगमगते. यामुळे मग पुढे जाऊन सिडिटी, अपचन अशा समस्या निर्माण होतात. अनेकदा गोळ्या घेऊनही आपले पोट नीट साफ होत नाही आणि सततची ही समस्या त्रासदायक ठरते. अशात आज आम्ही तुम्हाला एक साधा-सोपा पण प्रभावी असा घरगुती उपाय सांगत आहोत जो तुम्हाला काही मिनिटांतच पोटाच्या समस्यांपासून आराम मिळवून देऊ शकतो.

यासाठी तुम्हाला कोणत्याही औषधाची किंवा महागड्या साहित्याची आवश्यकता नाही. तर फक्त थंड पाण्याच्या मदतीने तुम्ही पोटातील त्रास लवकर कमी शकता. आज आपण च्या मार्गाने पोटाच्या समस्यांना दूर कसे करायचे ते जाणून घेणार आहोत. चला हा उपाय नेमका काय आहे आणि कसा करायचा याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

तुम्हालाही जर पोटाच्या समस्या जाणवत असतील जसे की जळजळ होणे किंवा मळमळ वाढणे अथवा पोट फुगलेलं वाटतं अशात थंडगार पाण्याचा एक घोट तुमच्या सर्व समस्यांना टाटा गुड बाय करू शकतं. यासाठी काही सेकंद पाण्याचा एक घोट तोंडात घ्या आणि तोंडातच सौम्यपणे फिरवत रहा. काही वेळाने हे पाणी थुकून टाका किंवा पिऊन घ्या. हा उपाय दर ५ मिनिटांतून ४-५ वेळा करा. यामुळे आपल्या शरीरातील सक्रिय होते, जी पचनक्रिया नियंत्रित करण्यास मदत करते. पाणी थंड असल्यामुळे शरीरातील जळजळ कमी होते आणि शरीराला थंडावा मिळतो.

म्हणजे काय? आपल्या शरीरात ही एक महत्त्वाची मेंदूशी जोडलेली नर्व्ह आहे, जी पचनतंत्राचे रेग्युलेशन करते.या नर्व्हच्या मदतीने शरीरातील वाढलेलं आम्लपित्त कमी होण्यास मदत होते. थंड पाणी तोंडात धरल्यामुळे ही नर्व्ह उत्तेजित होते आणि पोट शांत राहू लागतं. यामुळे समस्येच्या मूळ कारणावर उपचार करता येतो. हा उपाय मेंदू आणि पोट यंत्रणेला नैसर्गिक मार्गाने स्थिर करतो.

सिडीटीवर प्रभावी उपाय अनेकदा प्रवासात अरबट चरबट खाल्लं की मग सिडीटीचा त्रास जाणवतो. अशात आपल्याजवळ औषध नसतात. पण जवळ पाणी नसेल तर उपाय सहज करता येतो. पाण्याचा वापर योग्य पद्धतीने केल्यास पोटातील गॅस आणि उष्णतेचा त्रास दूर करता येतो. विशेषतः जेव्हा तुम्हाला उलटीसारखं वाटत असेल किंवा डोकं दुखत असेल तेव्हा हा उपाय तुम्हाला काही मिनिटांतच आराम मिळवून देईल. यामुळेच कधीही प्रवास करताना आपल्यासोबत एक थर्मस किंवा पाण्याची बाटली नेहमी सोबत ठेवा.

थंड पाणी तोंडात घेऊन हा उपाय केला की त्यांनतर काहीवेळ कोणतेही अन्न खाऊ नका. कमीत कमी ३ ते ४ तासानंतर तुम्हाला हवं ते खा पण तोपर्यंत पोटाला आराम द्या. यामुळे पोट पूर्णपणे शांत होण्यास आणि पोटातील सर्व सिड बाहेर पडण्यास मदत होते. त्यानंतरही हलकं आणि पचायला सोपं असणाऱ्या पदार्थांचे सेवन करा. त्रास कमी झाला की मग तुमच्या आवडीचे पदार्थ पुन्हा खाण्यास सुरुवात करा. मात्र कोणताही आहार या योग्य वेळेत आणि प्रमाणात खाण्याची सवय शरीराल आवर्जून लावून घ्या.

## सकाळीच होत नसेल पोट साफ, बद्धकोष्ठता होईल छुमंतर; ‘हे’ योगासन कराच

योगा केल्याने शरीराला अंतर्गत आणि बाह्य दोन्ही प्रकारे फायदे मिळतात. योगा केल्याने मानसिक फायदेदेखील मिळतात. त्याचबरोबर योगा केल्याने आरोग्याशी संबंधित अनेक प्रकारच्या समस्या दूर राहतात. २१ जून रोजी जगभरात योगा दिन साजरा करण्यात येतो. अनेक आजारांमध्ये उपयोगी ठरणारे योगा हे बद्धकोष्ठतेवरही उपयुक्त आहे. बद्धकोष्ठता हीदेखील पोटाशी संबंधित अशीच एक समस्या आहे, ज्यापासून मुक्त होण्यासाठी योगा करता येतो. येथे उल्लेख केलेले योगासन पेल्विक फ्लोअर मजबूत करते, पाय मजबूत करते आणि पोटाशी संबंधित समस्यांपासून आराम देते. बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांनी विशेषतः हा व्यायाम करावा. योगासन शिक्षिका काम्या देखील हा योगासन करण्याचा सल्ला देतात. जाणून घ्या हा कोणता योग आहे जो बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून म्हणजेच बद्धकोष्ठतेपासून आराम देतो. बद्धकोष्ठतेसाठी योगा बद्धकोष्ठतेपासून मुक्ती मिळविण्यासाठी मलासन करता येते. हे योगासन केल्याने पोट साफ नसण्याची समस्या दूर होते. इन्स्टाग्रामवर योगा टीचर काम्या `सुरुळींहझरूरने सांगितले की, जर मलासन करताना एक ग्लास कोमट पाणी प्यायले तर पोट लवकर साफ होते. बद्धकोष्ठता ही एक समस्या आहे ज्यामध्ये मल कठीण होतो आणि सहज बाहेर पडत नाही. शौचाच्या या समस्येला बद्धकोष्ठता म्हणतात. बद्धकोष्ठतेमुळे पोटात नेहमीच जडपणा येतो आणि पोट व्यवस्थित साफ न झाल्यामुळे पोटात वेदना आणि अस्वस्थता जाणवते. अशा परिस्थितीत, जर दररोज सकाळी ३० सेकंद ते १ मिनिटासाठी मलासन केले तर ते आतडे सहजपणे साफ करण्यास मदत करते. योगा टीचर काम्याचा व्हिडिओ मलासन कसे करावे मालासन करण्यासाठी, पाय वेगळे ठेवून उभे राहा आता तुमचे गुडघे वाकवा, तुमचा पाठीचा कणा सरळ ठेवा आणि हात समोर जोडून बसा यानंतर, पुन्हा उभे रहा. लक्षात ठेवा की तुमचा पाठीचा कणा सरळ असावा आणि तुम्ही तुमच्या नितंबांवर दबाव टाकून उठू नये, तर तुमची पाठ सरळ ठेवून उठण्याचा प्रयत्न करा.

## फादर्स डे निमित्त लाडक्या वडिलांसाठी सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा क्रिमी बटरस्कॉच मूस, घरातील सग्ळ्यांनाही नक्कीच आवडेल



प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वडील अतिशय महत्वाचे असतात. वडील मुलांच्या आनंदासाठी सतत काहींना काही करत असतात. दिवसरात्र कष्ट करून मुलांना शिक्षण देणे, त्यांचे पालनपोषण करणे, त्यांचे संगोपन करणे इत्यादी सर्वच जबाबदाऱ्या आईवडिलांकडे असतात. दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारी फादर्स डे साजरा केला जातो. वडिलांवरील प्रेम आणि आदर व्यक्त करण्यासाठी मोठ्या उत्साहात फादर्स डे साजरा केला जातो. या दिवशी सर्वच मुलं आपल्या वडिलांना सुंदर भेटवस्तू गिफ्ट देतात. तर वडिलांसाठी छान गोड पदार्थ घेऊन जातात. पण बाहेरील विकतचे पदार्थ आणण्याऐवजी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये घरी क्रिमी बटरस्कॉच मूस बनवू शकता. तुम्ही बनवलेला गोड पदार्थ तुमच्या वडिलांना नक्कीच खूप जास्त आवडेल. तुम्ही बनवलेला गोड पदार्थ वडिलांसोबतच घरातील सगळेच लोक आवडीने खातील. चला तर जाणून घेऊया क्रिमी बटरस्कॉच मूस बनवण्याची सोपी रेसिपी.


साहित्य:
- ब्राऊन शुगर
- बटर
- हेवी क्रीम
- मीठ
- व्हॅनिला इसेन्स
- थंड क्रीम
- जिलेटीन
- थंड पाणी

कृती: क्रिमी बटरस्कॉच मूस बनवण्यासाठी सर्वप्रथम, पॅन गरम करून त्यात बटर आणि ब्राऊन शुगर टाकून मिक्स करा. ३ ते ४ मिनिटं सतत चमच्याने मिक्स करत राहा. यामुळे साखर घट्ट होईल. त्यानंतर त्यात हेवी क्रीम आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करा.

तयार केलेले मिश्रण घट्ट झाल्यानंतर गॅस बंद करून थंड करून घ्या. त्यानंतर त्यात व्हॅनिला इसेन्स टाकून मिक्स करा.

वाटीमध्ये थंड पाणी घेऊन त्यात जिलेटीन टाकून ५ मिनिटं भिजवा. त्यानंतर पाणी गरम करून घ्या. तयार केलेले जिलेटीन बटरस्कॉचच्या मिश्रणात मिक्स करून घ्या. मिक्सरच्या भांड्यात थंड क्रीम घेऊन फेटून घ्या.

## दही खाण्यापूर्वी वाटी-चमच्याने करा ही चाचणी! सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट रुजुता दिवेकर यांनी सांगितला उपाय, का ते जाणून घ्या



सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट रुजुता दिवेकर यांच्या सल्ल्यामुळे करीना कपूर खान, आलिया भट्ट आणि वरुण धवन यांच्यासारख्या बॉलिवूडमधील आघाडीच्या कलाकारांना वजन कमी करण्यासाठी आणि आरोग्याशी तडजोड न करता त्यांच्या शरीरात बदल करण्यासाठी मदत झाली आहे. त्या सोशल मीडियावर सक्रिय आहेत, त्यांच्या इन्स्टाग्रामवर आरोग्याबाबत अनेक महत्त्वाच्या गोष्टी त्या सांगतात. अलीकडेच एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये दिवेकर यांनी एक सोपा उपाय सुचवला आहे, ज्यामुळे दही खाण्यायोग्य आहे की नाही हे ओळखण्यास मदत होईल. व्हिडीओमध्ये त्या सांगतात की, दही खाण्यापूर्वी त्यावर एक चमचा ठेवा. जर तो चमचा दह्यामध्ये बुडाला नाही आणि तसाच वर राहिला तर याचा अर्थ घट्ट दही लागले आहे, जे खाण्यास योग्य आहे. तसेच त्यांनी दही घट्ट आहे का नाही हे ओळखण्यासाठी वाटी उलटी करण्याचा सल्ला दिला. (वाटी उलटी करताना खाली एक ताटली ठेवा म्हणजे दही वाया जाणार नाही) दही घट्ट असेल तर दही अजिबात सांडणार नाही. जर दही घट्ट असेल तर ते खाण्यायोग्य आहे.

पोस्ट शेअर करताना कॅप्शनमध्ये सर्वोत्तम दही बनवण्यासाठी रेसिपी सांगितली आहे. १. शक्यतो म्हशीचे दूध खरेदी करा, कारण घट्ट दही लावण्यासाठी ते चांगले आहे. २. गरम केल्यावर, थोडेसे दूध बाजूला एका लहान वाटीत काढा. (हे भांडे चांदी, सिरॅमिक, माती यापैकी एक असेल तर उत्तम) ३. कोमटपेक्षा थोडे गरम असताना, त्यात आधी लावेल्या घरगुती दह्याचे एक छोटेसे मुरवण घाला. ४. ३२ वेळा ते ढवळून घ्या ५. दूध स्थिर होईपर्यंत वाट पाहा ६. हलक्या कापडाने झाकून ठेवा (धातूचे झाकण वापरणे टाळा) ७. नंतर ते थंड आणि अंधाऱ्या ठिकाणी ठेवा ८. ८-१२ तास पूर्ण झाल्यावर, पुन्हा दुसरे दही लावून ठेवा. जर तुम्ही ते लगेच खाणार नसाल तर रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा. चेन्नई येथील श्री रामचंद्र इन्स्टिटयूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर येथील प्राध्यापक आणि क्लिनिकल न्यूट्रशनिस्ट असलेल्या सी. व्ही. ऐश्वर्या यांनी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले की, दह्याची सुसंगतता, किण्वन गुणवत्ता आणि सूक्ष्मजीवांद्वारे केल्या जाणाऱ्या प्रक्रिया तपासण्यासाठी चमच्याने दह्याची चाचणी ही एक सोपी पण प्रभावी पद्धत आहे.

# नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात चमत्कार.! रुग्णालयात अवतरले चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टर!

केज/ प्रतिनिधी आजच्या घडीला ग्रामीण भागात नौकरी मिळणे म्हणजे नशीब लागतं कारण कोणत्याही विभागात असो या ठिकाणी नौकरी करणारे नोकरदार म्हणजे आताचे राजेचं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. कारण या ठिकाणी कोणता अधिकारी ,कर्मचारी कुठे, केंव्हा आणि कशी नौकरी करतो हे त्यालाच माहित त्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून कधी विचारणा होते की नाही. हा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. त्यातच ग्रामीण भागातील डॉक्टर तर स्वतःला आजचे राजेच समजत आहेत. एवढेच नव्हे तर नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात तर चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टर अवतरले असुन ते रुग्णांची तपासणी हात न लावता फक्त दहा फुट अंतरावरून पाहुनच करत आहेत. त्यामुळे अशा अंतर्ज्ञानी डॉक्टर महाशया मुळे रुग्न ठणठणीत बरे होत आहेत. मात्र अशा अंतर्ज्ञानी डॉक्टरांची वरिष्ठांनी तात्काळ दखल घेणे गरजेचे असुन त्यांना ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्यापेक्षा शहरातील रुग्णालयात पाठवले तर त्यांचे ज्ञान आणखी वाढेल.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की सध्या ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयात कर्तव्यावर असलेले डॉक्टर हे रुग्णांना कशी सेवा देतात ही बाब त्यांचे वरिष्ठ कधी पाहता की नाही. हे शंकास्पद आहे. या ठिकाणी नौकरी करणारे डॉक्टर यांना शासन जनतेच्या सेवेसाठी महिण्याकाठी लाखो रुपये पगार देत आहे. परंतु हे त्या डॉक्टरांच्या कधी लक्षात आलेच नाही हे पैसे आपल्याला रुग्नांची सेवा करण्यासाठी दिले जात आहेत. या उलट आपण केलेली मेहनत घेतलेले परिश्रम यांचा मोबदला आपल्याला मिळत असल्याचा भ्रम या डॉक्टर महाशयांना वाटत असावे. ते रुग्णसेवेला कधीच महत्त्व देत नाहीत.




सध्या केज तालुक्यातील नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात तर चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टरांची नेमणूक शासनाने केले असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यांचे झाले असे की, दि. १५ जुन २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजता दैनिक लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी पत्रकार महादेव काळे हे त्यांच्या पत्नी आजारी असल्याने त्यांना घेवुन नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात घेवुन गेले त्या ठिकाणी कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनसुके हे आपल्या खोलीत आराम करत होते. शिपायांनी त्यांना बोलावून आणले त्यावेळी देखिल ते पंधरा मिनिटांनी आले ते आल्यानंतर ते त्यांच्या रुग्णांना तपासण्यासाठी जी खोली असते त्या खोलीत न जाता ते थेट इंजेक्शन रुममध्ये गेले व त्या ठिकाणी एक परिचारीकाही उपस्थित होत्या. मनसुके या डॉक्टरांनी पत्रकार महादेव काळे व त्यांच्या पत्नीला या ठिकाणी बोलावून घेतले आणि दहा आफउट लांब उभा राहुन विचारले काय बोला....त्यांना आजाराविषयी माहिती सांगितल्यानंतर त्याच ठिकाणाहून त्यांनी परिचारिका यांना गोळ्या देण्यास सांगतल्या त्यावर पत्रकार महादेव काळे यांनी म्हटले की साहेब माझ्या पेशंटला तपासून पहा. मग औषध द्या त्यावर डॉक्टर म्हणाले की मी ईथुनच पाहिले आहे. या पत्रकार महादेव काळे यांनी डॉक्टरांना विनंती केली की डॉक्टर साहेब माझी पत्नी तापाने फनफनत आहे. तिला तपासणी करुन औषध उपचार करा. त्यावर डॉक्टर म्हणाले की तुम्ही पहिले बाहेर व्हा... मी मेडीकल ऑफिससर आहे. चला व्हा बाहेर. मी बिल सिव्हिल ला ड्युटी केली आहे. काय द्यायचं हे मला चांगले माहीत आहे. पत्रकार महादेव काळे मात्र त्यांनी दिलेल्या चार गोळ्या घेवून तापाने फनफनत असलेल्या पत्नीला घरी घेवुन गेले. या गोष्टींवरुन एक गोष्ट मग नक्की स्पष्ट होते ती म्हणजे की नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनसुके हे साधे सुधे डॉक्टर नसुन ते अंतर्ज्ञानी डॉक्टर आहेत.त्यांचेकडे रुग्नालयात आलेल्या रुग्णांना काय आजार आहे. किंवा त्यांना काय होतेय हे त्यांना अगदी १० फुटांवरुन कळतेय.त्यामुळे अशा कर्तव्य दक्ष डॉक्टरांना मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी या ग्रामीण भागात न ठेवता त्यांना शहरातील रुग्णालयात ठेवावे कारण त्या रुग्णालयात जास्त प्रमाणात रुग्न येतात. किंवा या डॉक्टर महाशयांवर क्रॉस व्हिजिट देवुन माहिती घ्यावी. अशा सर्व सामान्य जनतेतुन प्रतिक्रिया येत आहेत.

# लिओ लेडीज जिमचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा




केज/प्रतिनिधी केज शहरात लिओ लेडीज जिमचा प्रथम वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे. केज नगरपंचायत चे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत केज शहरात एकमेव लेडीज़ साठी प्रसिद्ध असलेली लिओ लेडीज़ जिमचा प्रथम वर्धापन दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिमच्या संचालिका सौ.स्नेहल एखंडे मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचन केले. तसेच डॉ.दिपाली बुदगुडे मॅडम यांनी महिलांना व्यायाम व आहार याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.यावेळी सौ.मोनिका गिरी मॅडम, सौ.मनीषा ढोकर,सौ.सुषमा कलेकर यांनी आपले गेल्या वर्षभरात जिम मध्ये आलेल्या अनुभवांबद्दल मत व्यक्त केले. त्यानंतर जिमचे ओनर श्री.विजय एखंडे सर यांनी जिम वर्कआउट का करायला पाहिजे तसेच आपला आहार कसा सकस असायला पाहिजे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी जिममधील सौ. रेश्मा सोळुंखे,सौ.सीमा जाजू,सौ.प्रियांका पाटील,सौ. पूजा मजमुले,सौ.दिपाली फल्ले, सौ.सुषमा बनसोडे,सौ.शामल खांडेकर,सौ.रिया एखंडे, कु.प्रतिक्षा शिंदे,कु.सेजल बियाणी आदीं उपस्थित होत्या.

# मस्साजोग आरोग्य उपकेंद्राला जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे एक लाखाचे व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार

केज/प्रतिनिधी आयुक्त आरोग्य सेवा व मिशन डायरेक्टर नॅशनल हेल्थ मिशन महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षात महाराष्ट्रातील सर्व आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र कायाकल्प पारितोषिक ही संकल्पना राबवण्यात आली होती. केज तालुक्यातील मस्साजोग आरोग्य उपकेंद्राला या पुरस्काराचा बीड जिल्ह्यातून पहिला क्रमांक येण्याचा मान मिळाला. सार्वजनिक आरोग्य सुविधांची गुणवत्ता वाढवणे, त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता तसेच सर्व अद्यावत तंत्रज्ञान अवगत करून आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे, आरोग्य उपकेंद्रातील स्वच्छता, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट, इन्फेक्शन कंट्रोल व आरोग्य सेवेतील गुणवत्ता या निकशावर सर्व आरोग्य उपकेंद्रांची विविध स्तरावर तपासणी करण्यात आली. या सर्व तपासणीमध्ये केज तालुक्यातील मस्साजोग आरोग्य उपकेंद्रास ९४.२० टक्के गुण मिळाल्याने हे आरोग्य उपकेंद्र जिल्ह्यात अव्वल ठरले मस्साजोग आरोग्य उपकेंद्राला जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे एक लाखाचे व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. हा पुरस्कार मिळवताना या आरोग्य केंद्रास मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने व जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.रौफ शेख, डॉ.शेकडे डी.आर.सी.एच. ओ यांचे मार्गदर्शन लाभले तसेच केज तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अशोक गवळी यांनी वेळोवेळी उपकेंद्राला भेटी देऊन मार्गदर्शन केले तसेच सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. मस्साजोग आरोग्य उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.मुळे,आरोग्य सेविका श्रीमती.थोरात.एस.एस,आरोग्य सेवक श्री.माने.एम.यु, पार्ट टाइम श्रीमती.शेख आर.वाय यांनी सर्व सूचनांचे पालन करून उपकेंद्राला प्रथम क्रमांक




आणण्यास योगदान राहिले.कायाकल्प चे जिल्हा समन्वयक डॉ.दराडे व श्री.बापू निकाळजे याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले डॉ.गायकवाड रोशन वैद्यकीय अधिकारी विडा,सरपंच, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य गावकरी यांनी अभिनंदन केले आहे. कायाकल्प पारितोषिक मध्ये केज तालुक्यातील उत्तेजनार्थ म्हणून १३ आरोग्य उपकेंद्रना मिळाले आहे त्यामध्ये आरोग्य उपकेंद्र पैठण,दहिफळ,लाडेगाव, लाडेवडगाव,चंदनसावरगाव, शिरूरघाट,बानेगाव,सारणीआनंदगाव,टाकळी,धनेगाव,साळेगाव, उंदरी,जाधवजवळा. तालुका आरोग्य अधिकारी केज डॉ.अशोक गवळी यांनी सांगितले केज तालुक्यातील मस्साजोग आरोग्य उपकेंद्र जिल्ह्यात अव्वल आल्याने मनस्वी आनंद वाटला तसेच यापुढे जास्तीत जास्त उपकेंद्रना व प्राथमिक आरोग्य केंद्रांना यावर्षी होणाऱ्या राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन मिळवण्याचा आमचा मानस आहे.

# चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी मनपाचे दहा दिवसीय तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर संपन्न.









लातूर /प्रतिनिधी :- लातूर महानगरपालिका व तायक्वांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतीने मनपा शाळा क्रमांक ११ येथे मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसुळे यांच्या संकल्पनेतून दिनांक ५ जून रोजी सुरू करण्यात आलेल्या तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचा आज दिनांक १५ जून रोजी मुख्याध्यापक वैभव बोंदर यांच्या उपस्थितीत चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी समारोप करण्यात आला. महानगरपालिकेतील शाळेत विविध क्रियाशील उपक्रमाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसुळे व मनपा शिक्षण विभाग प्रमुख श्वेता नागणे यांच्या संकल्पनेतून मनपा विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीशी लढता यावे व विद्यार्थी स्वयंसिद्ध व्हावे या हेतूने दहा दिवसीय तायक्वांदो प्रशिक्षण शिबिराचे लातूर मनपा व तायक्वांदो असोसिएशन यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. दहा दिवस चाललेल्या या तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना आशियाई तायक्वांदो प्रशिक्षक तथा राष्ट्रीय पंच मास्टर नेताजी जाधव, मास्टर धनश्री मदने व मास्टर जान्हवी मदने यांनी तायक्वांदो मार्शल आर्ट प्रशिक्षण दिले तर मनपा शाळेच्या वतीने दहा दिवस नियमित पोषक आहार, फळे व शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या शिबिरात प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी हाताने, पायाने व डोक्याने फरशा फोडून प्रशिक्षणात देण्यात आलेले धाडस, साहस, आत्मविश्वास, निर्भयता व असाधारण ताकदीचा प्रत्यय उपस्थितांना आणून दिला. या प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनात मनपा शाळा क्रमांक ११ चे शिक्षक देवराज लंगोटे, ईश्वरप्रसाद मांडे, सौ अनिता गुजे व भुतकर ताई यांनी हिरीरीने भाग घेतला होता.

# मनपा आयुक्तांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत शाळेच्या पहिल्याच दिवशी मनपा शाळेस नूतन आयुक्तांची भेट







लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन आयुक्त श्रीमती मानसी यांनी शाळेच्या पहिल्याच दिवशी मनपाच्या मंठाळे नगर येथील शाळा क्रमांक ९ येथे भेट दिली. पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी स्वागत केले.

शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी राज्य शासनाच्या निर्देशानुसार मनपाच्या वतीने सर्व शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मनपाच्या शाळेतही रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.शाळेला तोरणे लावून सजावट करण्यात आली होती. लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आलेल्या होत्या. मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी मंठाळे नगर येथील मनपा शाळेत विद्यार्थ्यांच्या भेटी घेतल्या. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फुगे, बिस्किट व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटपही त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आयुक्त श्रीमती मानसी म्हणाल्या की, शाळा म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण घेणे नव्हे. शाळा हे संस्कार करण्याचे ठिकाण आहे. शासनाच्या वतीने मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही बाबीची कमतरता भासू देणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मी शाळेत जात आहे,मी शाळेत आलो आहे, अशा सेल्फी पॉईंटचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी नवीन प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या पहिल्या पावलांचे ठसेही शाळेच्या वतीने घेण्यात आले.

यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मनपा शिक्षणाधिकारी श्रीमती श्वेता नागणे, जिल्हा निरीक्षक विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, शाळेचे मुख्याध्यापक शिवदास शिंदे यांच्यासह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.श्रीमती अर्चना वाघमारे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

पहिल्या दिवशी शाळेत येताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पहावयास मिळाला

# जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत



लातूर :- अंकुलगा (राणी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रवेशोत्सव कार्यक्रमाला खासदार डॉ. शिवाजी काळगे यांची उपस्थिती होती. यावेळी नवागतांचे पुष्प देवून स्वागत करण्यात आले. तसेच पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, गटशिक्षणाधिकारी अनिल पागे यावेळी उपस्थित होते. प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सजवलेल्या बैलगाडीतून ढोल ताशाच्या गजरात मिरवणूकीने शाळेत आगमन झाले. यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले.

मुरुडमधील पारूनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आमदार विक्रम काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा झाला. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. सकाळी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. यामध्ये शाळेत नव्याने प्रवेशित मुलासह सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. नव्याने प्रवेशित मुलांचे स्वागत करून यावेळी त्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. लामजना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव पार पडला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE